MHYA210002532026

**आदेश निशाणी क्रमांक ०१ खाली**

[दिनांक-१५/०४/२०२६]

१] अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे नावे वारसान प्रमाणपत्र देण्याकरिता मुंबई नियमन कायदा, १८२७ चे कलम २ अंतर्गत दाखल केला आहे.

२] अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र.१ चा मुलगा, अर्जदार क्र.२ चे पती व अर्जदार क्र.३ ते ५ चे वडील नामे मधुकर दादाजी डोहे हे मौजा सावंगी, ता.वणी, जि.यवतमाळ येथील कायमचे रहिवासी होते. ते दि.१८/०९/२०२५ रोजी सावंगी, ता.वणी, जि.यवतमाळ येथे मरण पावले. अर्जदार हे मयत मधुकर दादाजी डोहे यांचे एकमेव वारस आहेत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची गरज आहे. अर्जदार वगळता इतर कुणीही मयत मधुकर दादाजी डोहे यांचे वारस नाहीत. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३] अर्जदारांचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी अर्जातील कथनांप्रमाणे आपला युक्तिवाद सादर केला. अर्ज व त्यासोबत दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदारांनी त्यांचे अर्जाचे अनुषंगाने नि.क्र.०७ व ०९ नुसार जाहिरनामा प्रसिध्द केला. सदर जाहिरनाम्याची प्रत ही नगर परिषद, वणी, तहसील कार्यालय, वणी, ग्राम पंचायत, सावंगी व दिवाणी न्यायालय, वणी यांचे नोटिस बोर्डावर व मयताचे घरावर लावण्यात आली. तसेच, अर्जदारांनी दि.०६/०३/२०२६ रोजीचे दैनिक लोकदुत या वृत्तपत्रात जाहीर नोटिस प्रकाशित केली. अर्जदारांनी वृत्तपत्राची प्रत जाहिर नोटीससह नि.क्र.२० वर दाखल केले आहे. परंतु, अर्जदारांचे अर्जास आक्षेप प्राप्त झाला नाही.

४] अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.३/नितेश मधुकर डोहे यांनी त्यांचा पुरावा नि.क्र.१२ वर दाखल केला. अर्जदारांनी मयत मधुकर दादाजी डोहे यांचे मृत्यु प्रमाणपत्र, पोलीस पाटील, सावंगी यांना दिलेला वारसान अहवाल व सर्व अर्जदारांचे आधार कार्डचे प्रमाणित प्रती इत्यादी कागदपत्रे अनुक्रमे नि.क्र.१३ ते १९ वर दाखल केले. अर्जदारांचा पुरावा अपरिवर्तित राहिला आहे. त्यावर विश्वास न ठेवता येणारी कुठलीही बाब न्यायालयासमक्ष आली नाही. अभिलेखावरील पुराव्यावरून असे दिसून येते की, अर्जदार हे मयत मधुकर दादाजी डोहे यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत मधुकर दादाजी डोहे यांना अर्जदारांव्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. सबब, अर्जदारांचे नावे वारसान प्रमाणपत्र देण्यास कोणताही अडथळा येत नाही. म्हणून, मी पुढील आदेश पारित करीत आहे;

## आदेश

१] अर्ज मंजुर करण्यात येतो.

२] अर्जदारांना **मयत मधुकर दादाजी डोहे** यांचे कायदेशीर वारस म्हणून घोषित करण्यात येते.

३] अर्जदारांनी विहित मुद्रांक शुल्क जमा केल्यानंतर त्यांचे नावे वारसान प्रमाणपत्र देण्यात यावे.

SHAHAJI DATTARAO BHOSLE
Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE
Date: 2026.04.15 14:15:40 +0530

ठिकाण : वणी
दि.१५/०४/२०२६

**(शहाजी दत्तराव भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), वणी.

मी, अभय प्रमोद भोयर, लघुलेखक (सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), वणी) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ आदेशाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.